N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस स्टेशन कार्यालय हिंगोली (शहर)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** हिंगोली **P.S.(ठाणे):** हिंगोली शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0731 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**31/08/2023 02:21

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 30/08/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 30/08/2023

**Time From (वेळेपासून):** 15:20 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:38 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 31/08/2023 **Time (वेळ):** 02:05 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/08/2023 02:05 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समीती हिंगोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** माधव निळकंठ ठोंबे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कन्हेरगाव नाका,गोरेगांव,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कन्हेरगाव नाका,गोरेगांव,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 191-9922391711

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जमीलखान महमदखान पठाण | | | 1. इंडीयन बेकरी जवळ,आझम कॉलनी,हिंगोली ,हिंगोली शहर, हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | ( 500 रु दराच्या 20 चलनी नोटा) | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 30.08.2023

मी माधव निळकंठ ठोंबे, वय 43 वर्षे व्यवसाय, शेती, रा. कन्हेरगाव नाका, ता. जि. हिंगोली.
मो.9922391711

समक्ष अँन्टी करप्शन ब्युरो हिंगोली येथे हजर येवुन फिर्याद देतो कि, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन शेती व्यवसाय करून कुंटूबाचा उदरनिर्वाह करतो. मी दिनांक 30.08.2023 रोजी 13.30 वा सुमारास अँन्टी करप्शन ब्युरो हिंगोली येथे श्री प्रफुल्ल अंकुशकर पोलीस निरीक्षक यांचेकडे लेखी तक्रार दिली होती कि, मला मागील तीन महिण्यापुर्वी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना सन 2022-2023 अंतर्गत अहिल्याबाई होळकर सिंचन योजनेतुन विहीर मंजुर झाली होती. या विहीर बांधकामाकरीता मला सदर योजने अंतर्गत 3,90,000/-रूपये मंजुर झाले होते. त्याप्रमाणे सदर विहीरीचे बांधकाम पुर्ण केलेले असुन आजपर्यंत 2,63,000/-रूपये रक्कम अदा करण्यात आले असुन कुशलचे बिल (शेवटचा हप्ता) येणे बाकी आहे. तसेच आमचे गावातील शेतकरी शिवाजी गावंडे व सुरेश बरवे यांचेपण महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना सन 2022-2023 अंतर्गत अहिल्याबाई होळकर सिंचन योजनेतुन विहीर मंजुर झाली होती त्यांचेपण विहीरीचे बांधकाम पुर्ण झालेले असुन कुशलचे बिल (शेवटचा हप्ता) येणे बाकी आहे.

दिनांक 28.08.2023 रोजी आम्ही तिघेही तांत्रीक सहाय्यक (कंत्राटी) पठाण यांना भेटुन आमचे तिघांचेही बांधकाम पुर्ण झालेल्या विहीरीचे बिले व विहीराचा फोटो त्यांना देवुन लवकरात लवकर मोजमाप पुस्तकीवर नोंद घेवुन प्रस्ताव पंचायत समीती हिंगोली येथे दाखल करण्यासाठी विनंती केली असता तांत्रीक सहाय्यक (कंत्राटी) पठाण हे आम्हाला म्हणाले की, तुमचे प्रत्येकाचे अंदाजे एक ते दिड लाखाचे बिल आहेत तेव्हा तुम्ही प्रत्येकी पाच ते सहा हजार रूपये आणुन दया तरच मी तुमचे कागदपत्र घेतो व तुमचे काम करतो असे म्हणुन लाचेची मागणी केली आहे. त्यामुळे त्यांचेविरूध्द कायदेशीर कार्यवाही करावी अशी लेखी तक्रार दिली होती.

माझे तक्रारीचे अनुषंगाने ला.प्र.वि. हिंगोली येथील पोलीस निरीक्षक श्री अंकुशकर साहेब यांनी दोन शासकिय पंच नामे 1) श्री स्वप्नील सुधाकर क्षिरसागर वनरक्षक, वनविभाग हिंगोली 2) श्री विनोद कुशेंद्र लंगाळे लिपीक वन विभाग हिंगोली यांचा परीचय करून दिला व मी दिलेली लेखी तक्रार त्यांना दाखविण्यात आली होती.

त्यानंतर दिनांक 30.08.2023 रोजी करण्यात आलेल्या तक्रार पडताळणी कार्यवाही दरम्यान मी व पंच क्र. 1 क्षिरसागर वनरक्षक, यांचेसह तांत्रीक सहाय्यक (कंत्राटी) पठाण यांची भेट घेण्याकरीता पंचायत समीती कार्यालय हिंगोली येथे गेलो असता तिथे पठाण यांची भेट झाली त्यांचेशी माझे व शिवाजी गांवडे यांचे कामासंबधी बोलणी करत असतांना इतर लोकसेवक पठाण यांनी आमचे तिघांच्या कामाचे कमीत कमी पाच पाच तरी द्या असे म्हणुन 15,000/- रू लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याची सहमती दर्शविली.

त्यावरून दिनांक 30.08.2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली येथे सापळा पुर्व कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर दिनांक 30.08.2023 रोजी 17.03 वा दरम्यान मी, पंच व सापळा पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी असे तांत्रीक सहाय्यक (कंत्राटी) पठाण यांना भेटण्यासाठी पंचायत समीती कार्यालय हिंगोली कडे रवाना झालो. तेव्हा माझी व तांत्रीक सहाय्यक (कंत्राटी) पठाण यांची पंचायत समीती समोर मोकळया जागेत भेट झाली तेव्हा इलोसे पठाण म्हणाले की, मी सात सात, आठ आठ घेत असतो हे चार चार लाखा च्या विहीरीवाल्याचे ...... असे म्हणुन पैशाची मागणी करून किती हायत.... दहा हायत का.... असे म्हणुन लाचेची रक्कम 10,000/- रू त्यांनी पंचासमक्ष स्वतः स्विकारून सदरची रक्कम मोजुन घेवुन त्यांचे पॅटचे डाव्या खिशात ठेवली त्यानंतर सापळा पुर्व कार्यवाही दरम्याण ठरल्याप्रमाणे सापळा पथकास इशारा केला म्हणजेच माझे पॅटचे खिशातील पांढरे रंगाचा रूमाल डावे हाताने काढुन तोंड पुसून हातात धरला व लाच स्विकारल्याचा इशारा केला तेव्हा तांत्रीक सहाय्यक (कंत्राटी) पठाण यांना 17.38 वा सुमारास पंचायत समीती समोर मोकळया जागेत सापळा

पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी पकडले व त्यांचेकडुन शासकिय पंचाचे समक्ष 10,000/- रू लाचेची रक्कम जप्त केले. त्यानंतर तांत्रीक सहाय्यक (कंत्राटी) पठाण यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले. सदर पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्याण माझे व तांत्रीक सहाय्यक (कंत्राटी) पठाण यांचेशी प्रत्यक्ष भेटी दरम्याण झालेले संभाषण हे व्हाईस रेकॉर्डर मेमरीकार्डमध्ये रेकॉर्ड करण्यात आले आहे.

तरी तांत्रीक सहाय्यक (कंत्राटी) पठाण, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना विभाग, पंचायत समिती, हिंगोली यांनी त्यांचे पदाचा दुरूपयोग करून त्यांना मिळणारे परिश्रमिका खेरीज 10,000/- रू लाचेची रक्कम स्वतः स्विकारली म्हणुन त्यांचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी म्हणुन मी फिर्याद देत आहे.

माझी वरील फिर्याद मी सापळा कार्यवाही झाल्यानंतर ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली येथे आज दिनांक 30.08.2023 रोजी पोलीस निरीक्षक श्री अंकुशकर यांना तोंडी सांगीतली असुन ती संगणकावर टंकलीखीत केली असुन माझे वरील फिर्याद प्रिंट काढल्यानंतर मी माझी फिर्याद वाचुन पाहिली असुन माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष                                        फिर्याद दिली सही.

( प्रफुल्ल अंकुशकर )
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो हिंगोली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
PRAFULL HANUMANTRAO ANKUSHKAR
**Rank** (पद): I (Inspector)    **No.**(क्र.): PI
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

**15.Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

हवा 556.
पोलीस ठाणे अमलदार
पा.स्टे.हिंगाली (शहर)

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** VIKAS SHEKUJI PATIL
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** POBN62686